महाराष्ट्र शासन
GOVERNMENT OF MAHARASHTRA
पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
COMMISSIONERATE OF ANIMAL HUSBANDRY
स्पायसर मेमोरीअल कॉलेजसमोर, औंध रोड, औंध, पुणे- ४११ ०६७.
Opp. SPICER MEMORIAL COLLEGE, AUNDH ROAD, AUNDH] PUNE-411 067.
E-mail: cah.gnl@gmail.com
☎: 020-25690480 Extn: 259

जावक क्र: जीआरडी/ज्येसू/प्र.क्र.०१/३०९/२०२५ , पसं-०३, पुणे-६७ दि.१७/०९/२०२५.

प्रति,

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, नागपूर
२. प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त (सर्व)
३. सहआयुक्त पशुसंवर्धन, पशुवैद्यकिय जैव पदार्थ निर्मिती संस्था, औंध, पुणे
४. सहआयुक्त पशुसंवर्धन, रोग अन्वेषण विभाग, औंध, पुणे
५. प्राचार्य, राज्यस्तरीय प्रशिक्षण केंद्र, गोखलेनगर, पुणे
६. उपआयुक्त पशुसंवर्धन, गुणनियंत्रण, गोरेगांव, मुंबई
७. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त (सर्व)
८. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
९. सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, एकात्मिक पाहणी योजना, पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे
१०. सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, खाद्य विश्लेषण प्रयोगशाळा, गोखले नगर, पुणे

**विषय: दि.०१/०१/२०२५** रोजीची **उपआयुक्त पशुसंवर्धन (गट-अ), वेतन बँड रु. १५६००-३९१०० ग्रेड वेतन रु. ६६००/- (७ व्या वेतन आयोगानुसार एस-२३: ६७७००-२०८७००/-)** या संवर्गाची तात्पुरती (Provisional) ज्येष्ठतासुची प्रसिध्द करणेबाबत......

**संदर्भ:** शासन परिपत्रक क्र.DAHD/११०११/२००/२०२५-DAHD-AH१(१३४०३९८) दि.१७/०९/२०२५

उपरोक्त विषयास अनुसरुन **उपआयुक्त पशुसंवर्धन (गट-अ)** या संवर्गात दि.०१/०१/२०२४ ते ३१/१२/२०२४ या कालावधीत नव्याने नियुक्त/पदोन्नती झालेल्या अधिकाऱ्यांची दि.०१/०१/२०२५ रोजीची तात्पुरती ज्येष्ठतासुची तयार करण्यात आली होती. त्यावर वरील संदर्भीय पत्रान्वये शासनाची मंजूरी प्राप्त झालेली आहे.

सर्व प्रस्तुत कार्यालय प्रमुखांना सुचित करण्यात येते की, सदर संवर्गाची सोबत जोडलेली दि.०१.०१.२०२५ रोजीची तात्पुरती ज्येष्ठतासुची (विवरणपत्र-अ) आपल्या विभागातील कर्मचाऱ्यांच्या (रजेवर/प्रतिनियुक्तीवर असलेल्या कर्मचाऱ्यांसह) निदर्शनास आणावी. सदर संवर्गातील कर्मचाऱ्यांचे काही आक्षेप/ त्रुटी याबाबत प्राप्त झालेल्या निवेदनातील मुद्यांबाबतची माहिती विभागातील अभिलेखानुसार तपासुन विभागाच्या अभिप्रायासह सदर निवेदन खात्यास सदर ज्येष्ठतासुची प्राप्त झाल्याच्या तारखेपासुन १५ दिवसाचे आत पाठवावीत. विहित कालावधीत आक्षेप/ निवेदने प्राप्त न झाल्यास ज्येष्ठतासुची मधील नमूद केलेला तपशील बरोबर असल्याचे गृहीत धरुन सदर संवर्गाची अंतिम ज्येष्ठतासुची प्रसिद्ध करण्यात येईल तसेच विहीत कालावधीनंतर प्राप्त झालेल्या निवेदने/ आक्षेपांवर विचार करण्यात येणार नाही.

तरी **उपआयुक्त पशुसंवर्धन (गट-अ) या** संवर्गाची दि.०१/०१/२०२५ रोजीची तात्पुरती ज्येष्ठतासुची प्रसिध्द करणेस्तव खात्याच्या संकेतस्थळावर देखील उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

www.dahd.maharashtra.gov.in

( डॉ. शामकांत प्रभाकर पाटील )
सहआयुक्त पशुसंवर्धन (मुख्यालय)
पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
औंध, पुणे-६७

**प्रत:** कार्यासन अधिकारी, कार्यासन पसं-२, यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी

पशुसंवर्धन विभागातील उपायुक्त पशुसंवर्धन (गट-अ) या संवर्गाची दि.०१/०१/२०२५ रोजीची तात्पुरती (Provisional) ज्येष्ठतासूची प्रसिध्द करणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
**शासन परिपत्रक क्र : DAHD-११०११/२००/२०२५-DAHD-AH१ (१३४०३९८),**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, विस्तार मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १७ सप्टेंबर, २०२५.

**वाचा** :-
१) सामान्य प्रशासन विभाग शासन अधिसूचना दि. २१/०६/२०२१.
२) आयुक्त पशुसंवर्धन यांचे पत्र क्र. जीआरडी/ज्येसू/प्र.क्र. / /२०२५, पंस-३, दि. १६/०९/२०२४

**शासन परिपत्रक :**

पशुसंवर्धन विभागातील उपायुक्त पशुसंवर्धन (गट-अ) वेतनश्रेणी एस-२३: ६७७००-२०८७००/- या संवर्गामधील अधिकाऱ्यांची दि. ०१/०१/२०२५ रोजीची तात्पुरती (Provisional) ज्येष्ठतासूची सोबतच्या **"विवरणपत्र-अ"** मध्ये प्रसिद्ध करण्यात येत आहे.

२. सदर तात्पूरती ज्येष्ठतासूची आयुक्त पशुसंवर्धन यांनी सर्व संबंधित अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणावी. या ज्येष्ठतासूचीच्या अनुषंगाने ज्या अधिकाऱ्यांचे आक्षेप असतील त्यांनी १५ दिवसांच्या आत शासनाकडे सादर करुन त्याची प्रत आयुक्त पशुसंवर्धन यांना पाठवावी. सदर कालावधीत आक्षेप प्राप्त न झाल्यास या ज्येष्ठतासूचीच्या अनुषंगाने कोणतेही आक्षेप नाहीत असे गृहीत धरुन अंतिम ज्येष्ठता सूची प्रसिध्द करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by
VARSHA M MEHER
Date: 17-09-2025
15:58:33
(वर्षा मं. मेहेर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) आयुक्त पशुसंवर्धन, पशुसंर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-६७
- यांना कळविण्यात येते की, सदर ज्येष्ठता सूची पशुसंवर्धन आयुक्तालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

२) उप सचिव (पशुसंवर्धन) यांचे स्वीय सहायक
३) सर्व संबंधित अधिकारी........(आयुक्त पशुसंवर्धन यांचे मार्फत)
४) निवड नस्ती (पदुम-१)

शासन परिपत्रक क्र. DAHD-११०११/२००/२०२५-DAHD-AH१ (१३४०३९८), दि.१७.०९.२०२५ सोबतचे
विवरणपत्र-अ

१. संवर्गाचे नाव: उपआयुक्त पशुसंवर्धन
२. वेतनश्रेणी: एस-२३ : ६७७००-२०८७००

३. दि.०१/०१/२०२५ रोजीची तात्पुरती ज्येष्ठतासूची (दि.०१.०१.२०२४ ते ३१.१२.२०२४ या कालावधीत नियतकालीक पदोन्नती/ सरळसेवने नियुक्त उपायुक्त पशुसंवर्धन, गट-अ यांची यादी)

| अ. क्र. | नियम ३ (२) (ब) नुसार ज्येष्ठता क्रमांक | अधिकाऱ्याचे नाव | संबंधित पदावरील नियुक्तीचा मार्ग | जन्म दिनांक (दिनांक-महिना-वर्ष) | प्रवर्ग | नियम ३ (२) (अ) नुसार संवर्गात प्रत्यक्ष रुजु दिनांक | ज्येष्ठतेचा दिनांक | सेवानिवृत्तीचा दिनांक (दिनांक-महिना-वर्ष) | शैक्षणिक अर्हता (ज्या पदासाठी आवश्यक आहे तेथेच हा रकाना अंतर्भूत करावा) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| खंड दि.०१.०१.२०२४ ते दि.३१.१२.२०२४ | | | | | | | | | | |
| १ | १ | डॉ. पाटील गिरीश रमेश | पदोन्नती | १.११.१९७२ | इ.मा.व. | १६.१०.२०२४ | १६.१०.२०२४ | ३१.१०.२०३० | एम.व्ही.एस.सी | शासन नियुक्ती आदेश दि.१५.१०.२०२४ अन्वये उपआयुक्त पशुसंवर्धन पदावर पदोन्नती |
| २ | २ | डॉ. बिलोलीकर समिर चंद्रकांतराव | पदोन्नती | ९.४.१९७३ | अमागास | १८.१०.२०२४ | १८.१०.२०२४ | ३०.०४.२०३१ | एमव्हीएस्सी. फिजिऑलॉजी | शासन नियुक्ती आदेश दि.१५.१०.२०२४ अन्वये उपआयुक्त पशुसंवर्धन पदावर पदोन्नती |

Digitally signed by
VARSHA M MEHER
Date: 17-09-2025
15:59:03

(वर्षा मं. मेहेर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन